# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.03.2025** **वारःशुक्रवार**

---

1. विकसित भारताच्या निर्मितीसाठी गावांचा विकास आवश्यक-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. महाराष्ट्र सरकारच्या डिजिटल प्रशासनासाठी मायक्रोसॉफ्ट सहकार्य करणार
3. 2024या वर्षासाठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर.
4. छत्तीसगढमधे दोन वेगवेगळ्या चकमकींमध्ये 30 माओवादी ठार; पुढच्या वर्षी 31 मार्चपर्यंत देशातून नक्षलवादाचा बीमोड झालेला असेल, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास आणि
5. स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद जोडीचा उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश

**पीएम बावलियाली धाम**

विकसित भारताच्या निर्मितीच्या दिशेनं पहिलं पाऊल म्हणून गावांचा विकास करण्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केली आहे. गुजरातच्या भारवाड समाजाशी संबंधित बावलियाली धाम इथं झालेल्या कार्यक्रमात ते काल दूरस्थ माध्यमातून बोलत होते. ग्राम विकासासाठी सामूहिक प्रयत्नांचं महत्त्व अधोरेखित करताना, 'सबका प्रयास' ही देशाची सर्वात मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले. समाजाचं सक्षमीकरण करण्यासाठी शिक्षणाचं महत्व या मुद्द्यावर त्यांनी भर दिला. आगामी पिढीने शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनून, सुदृढ समाजासाठी योगदान द्यावं, असं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं. भारवाड समाजाची सेवानिष्ठा, निसर्गप्रेम आणि गोरक्षणाप्रती असलेल्या बांधिलकीची त्यांनी प्रशंसा केली.

**बिलगेट्स-मुख्यमंत्री**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांची काल मुंबईत भेट घेतली. यावेळी त्यांच्यात आरोग्य, कृषी आणि पायाभूत सुविधांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या वापराबाबत सकारात्मक चर्चा झाली. डिजिटल प्रशासन आणि सेवेचा अधिकार या क्षेत्रात महाराष्ट्राला देशात आदर्श राज्य बनवण्यासाठी मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनं सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांच्या 25 लाख लखपती दीदींचे महिला स्वयंरोजगाराचं, उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणि महिला उद्योजक बनविण्यासाठी गेट्स फाऊंडेशनने या उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शविली आहे.

**संसद**

लोकसभेत काल विरोधी पक्ष सदस्यांनी सरकारविरोधी घोषणा छापलेले कपडे घालून सभागृहात प्रवेश केला. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेला विरोध दर्शवणाऱ्या घोषणा छापलेले कपडे परिधान करुन द्रमुकचे सदस्य सभागृहात आले होते. सभापती ओम बिरला यांनी त्याला हरकत घेत सदस्यांना बाहेर जाण्यास सांगितलं, मात्र तसं न करता सदस्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज 2 वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आधी 12 वाजेपर्यंत, दुसऱ्यांदा 2 वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं.

**भाजप-पक्षादेश**

भारतीय जनता पार्टीनं आपल्या लोकसभा सदस्यांना आज सभागृहात उपस्थित राहण्याचा पक्षादेश जारी केला आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या अनुषंगानं विविध मंत्रालयांच्या अनुदानाच्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी हा पक्षादेश जारी करण्यात आला असल्याचं वृत्त आहे.

**विधिमंडळ**

महाराष्ट्रातल्या राज्यातल्या धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर 20 हजार रुपये निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. जास्तीत जास्त 2 हेक्टरसाठी हा निधी दिला जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत केली. शेतकरी कर्जमाफी संदर्भात माहिती गोळा करायचं काम सुरू आहे, असंही ते म्हणाले. आर्थिक परिस्थिती पाहून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवण्याचा निर्णय घेऊ याचा पुनरुच्चार त्यांनी केला. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान काही सदस्यांनी तरतुदीच्या तुलनेत अतिशय कमी खर्च झाल्याचा आरोप अजित पवार यांनी फेटाळून लावला. लॉटरी आणि ऑनलाइन लॉटरीच्या माध्यमातून सरकारचे उत्पन्न वाढवण्यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणाही त्यांनी केली. अर्थसंकल्पातल्या वित्त, उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि नियोजन विभागाच्या अनुदानाच्या मागण्या काल विधानसभेत मंजूर करण्यात आल्या.

**पुरस्कार**

2024 या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केली. 25 लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.राम सुतार यांचं वय 100 वर्ष आहे. त्यांनी केवडीया इथला स्टॅच्यू ऑफ युनिटी, मुंबईत इंदू मिल इथल्या स्मारकातला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, आदि अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे आणि अनेक शिल्पं घडवली आहेत. सिंधुदुर्ग इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रस्तावित पुतळा उभारण्याचे काम त्यांच्याकडून सुरू आहे. दरम्यान राम सुतार यांना जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहास, कला, सांस्कृतिक क्षेत्राचा गौरव असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. तर हा पुरस्कार जाहीर झाल्यानं पुरस्काराची प्रतिष्ठा उंचावली आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राम सुतार यांचं अभिनंदन केलं.

**माओवादी**

छत्तीसगढमध्ये नक्षलग्रस्त भागात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकींमधे 30 माओवादी ठार झाले, तर जिल्हा राखीव दलाच्या एका जवानाला वीरमरण आलं. बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमाभागात माओवादी लपले असल्याची माहिती मिळाल्यानं सुरक्षा दलांची संयुक्त पथकं शोधमोहीम राबवत होती. त्यावेळी गंगलूर भागात ही चकमक उडाली. या चकमकीत 26 नक्षली दहशतवादी ठार झाले. या ठिकाणी शस्त्रास्त्र आणि स्फोटकांचा मोठा साठा सापडला आहे. या मोहिमेत सुरक्षा दलाचा एक जवान शहीद झाला. दुसऱ्या घटनेत, कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलं आणि माओवाद्यांमधे झालेल्या चकमकीत 4 माओवादी ठार झाले.

**अमित शहा**

सर्व प्रकारच्या सोयी सुविधा दिल्यानंतरही शरण येत नसलेल्या माओवाद्यांविरोधात सरकारचं धोरण कठोरचं राहील असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सुरक्षा जवानांनी नक्षलमुक्त भारताच्या उद्दिष्टातला मोठा टप्पा कालच्या कारवाईत गाठला असून, पुढच्या वर्षी 31 मार्चपर्यंत देशातून नक्षलवादाचा बीमोड झालेला असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**एनपीएस**

निवृत्ती वेतन नियामक आणि विकास प्राधिकरण पीएफआरडीएने एकीकृत निवृत्तीवेतन योजना, म्हणजेच यूपीएस कार्यान्वित करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारने या वर्षी जानेवारीमध्ये यूपीएस ही योजना आणली आहे. याचे नियम पुढच्या महिन्याच्या 1 तारखेपासून लागू होतील. एनपीएस अंतर्गत येणारे आणि 1 एप्रिल 2025 पर्यंत केंद्र सरकारी सेवेत असलेले कर्मचारी, 1 एप्रिल 2025 रोजी किंवा त्यानंतर

केंद्र सरकारच्या सेवेत भरती झालेले कर्मचारी आणि 31 मार्च 2025 रोजी किंवा त्यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या किंवा स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.

**इस्राईल-गाझा**

इस्राइलने गाझामध्ये पुन्हा लष्करी कारवाया सुरू केल्यानंतर हमासने प्रथमच प्रत्युत्तरादाखल तेल अविववर रॉकेट हल्ले केले आहेत. त्यापैकी एक रॉकेट निकामी करण्यात आलं असून इतर दोन रॉकेट निर्जन क्षेत्रात पडल्याचं इस्राईलच्या संरक्षण दलानं सांगितलं. दरम्यान, गाझामध्ये हमास संचालित आरोग्य मंत्रालयानं सांगितलं की, इस्राइल मध्यरात्रीपासून करत असलेल्या हवाई हल्ल्यात किमान 85 जणांचा मृत्यू झाला असून मंगळवार पासून आतपर्यंत 500 हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून 133 जण जखमी झाले आहेत. हमासने अजूनही 59 जणांना ओलिस ठेवले असून त्यापैकी 24 जण जीवंत असल्याचा दावा इस्राईल सरकारने केला आहे.

**बॅडमिंटन**

त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारताच्या मानांकित महिला बॅडमिंटनपटू जोडीनं स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी जर्मनीच्या एमिली लेहमन आणि सेलीन हब्शचा 21-12, 21-8 असा पराभव केला. उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी त्यांचा सामना हाँगकाँग-चीनच्या येउंग नगा टिंग आणि येउंग पुई लाम या जोडीविरुद्ध होणार आहे.

**पॅरागेम्स**

खेलो इंडिया पॅरा गेम्सच्या दुसऱ्या पर्वाचं उद्घाटन केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये झालं. महाराष्ट्राच्या सुकांत कदम याने उद्घाटनाचा दिवस गाजवला. त्याने पॅरा बॅडमिंटनमध्ये एस एल 4 गटात महाराष्ट्राच्याच निलेश गायकवाडचा 21-10, 21-19 सेटने पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. व्हीलचेअरच्या डब्ल्यू एच 1 गटात महाराष्ट्राच्या प्रेमकुमार अले यानेही उपांत्यपूर्व फेरीतील आपलं स्थान पक्क केलं.

**कबड्डी**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष संघाने काल वेल्सचा 102-47 असा पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. भारतीय पुरुष संघाचा उपांत्यपूर्व आणि महिला संघाचा उपांत्यफेरीतील सामने आज होणार आहेत.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार